आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 • वर्ष ९ वे • अंक २४४ वा • शुक्रवार ०३ एप्रिल २०२६ • किंमत २ रूपया • पाने ४ •




## भोकर शहारातील दोन तरुण भोसी जवळ कॅनलमध्ये वाहून गेले ; अद्याप बेपत्ता

भोकर /प्रतिनिधी/तालुक्यातील भोसी गावाजवळून जाणाऱ्या मुख्य कॅनलमध्ये दोन तरुण वाहून गेल्याची हृदयद्रावक घटना गुरुवार, २ एप्रिल रोजी सायंकाळी ५:०० वाजेच्या सुमारास घडली. शेख रिजवान शेख शादुल (१७) आणि नुमान बेग समीउल्ला बेग (१८) अशी वाहून गेलेल्या तरुणांची नावे असून, ते दोघेही भोकर शहरातील शास्त्रीनगर भागातील रहिवासी आहेत. या घटनेमुळे संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, रिजवान आणि नुमान हे दोघे मित्र भोसी जवळील 'गदा मारुती' येथे आयोजित भंडाऱ्यात जेवण करुण घराकडे परतत असताना, कॅनलच्या काठावर हात-पाय धुण्यासाठी ते थांबले. मात्र धरणातून पाणी सोडल्यामुळे कॅनलचा प्रवाह धोक्याच्या पातळीवर आणि अत्यंत वेगवान आहे. पाण्याचा अंदाज न आल्याने दोघेही प्रवाहाच्या ओढ्यामुळे वाहून गेले. काठावर त्यांची मोटरसायकल आणि इतर वस्तू तशाच पडून होत्या, ज्यावरून ही घटना निदर्शनास आली.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी आपल्या सहकाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी शोधमोहिमेला गती दिली आहे. सध्या पोलीस जमादार दीपक कंधारे हे या शोधकार्याचे नेतृत्व करत असून,पोलीस यंत्रणा पूर्ण क्षमतेने तरुणांचा शोध घेत आहे.

केवळ पोलीसच नव्हे तर पोलीस मित्र जुनेद पटेल,भोसी व परिसरातील स्थानिक नागरिक तसेच भोकर शहरातील अनेक तरुणांनी घटनास्थळी धाव घेऊन शोधमोहिमेत सहभाग नोंदवला आहे. पाण्याचा प्रवाह प्रचंड असल्याने शोध घेण्यात अडथळे येत असले, तरी स्थानिक पोहणारे आणि तरुणांचे पथक जीवाची पर्वा न करता कॅनलच्या पात्रात मुदखेड पर्यंत शोध घेत आहेत.

रात्री उशिरापर्यंत या दोन्ही तरुणांचा अद्याप कोणताही ठावठिकाणा लागलेला नाही. शास्त्रीनगर परिसरातील दोन तरुणांचा अशा प्रकारे अपघात झाल्याने परिसरात शोककळा पसरली असून, त्यांचे कुटुंबिय व मित्रमंडळी मोठ्या आशेने शोधमोहिमेकडे डोळे लावून बसले आहेत.

## भारतीय टपाल विभागाची फ्रँचायझी २.० योजना सुरु; रोजगारासह टपाल सेवा विस्ताराची मोठी संधी

लातूर, दि. २ (जिमाका): भारतीय टपाल विभागामार्फत नागरिकांना अधिक वेगवान, सुलभ आणि त्यांच्या निवासस्थानाच्या जवळ टपाल सेवा उपलब्ध करून देण्यासाठी फ्रँचायझी २.० ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून स्थानिक उद्योजक, दुकानदार आणि इच्छुक व्यक्तींना विभागाचे अधिकृत फ्रँचायझी भागीदार म्हणून काम करण्याची संधी मिळणार असून, टपाल सेवा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. फ्रँचायझी धारकांना स्पीड पोस्ट, नोंदणीकृत टपाल, पार्सल बुकिंग आणि टपाल वितरण यांसारख्या सेवा पुरविता येतील. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जलद व कार्यक्षम सेवा देण्यासोबतच, या योजनेमुळे स्थानिक युवकांसाठी स्वयंरोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये टपाल सेवेचा विस्तार करणे आणि विभागाच्या देखरेखीखाली एक विश्र्वसनीय यंत्रणा उभी करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ज्या इच्छुक नागरिकांकडे आवश्यक जागा, मूलभूत सोयी-सुविधा आणि निर्धारित पात्रता आहे, ते या योजनेसाठी अर्ज करू शकतात. फ्रँचायझी २.० योजना ही टपाल सेवांचा विस्तार, डिजिटल सक्षमीकरण आणि रोजगारनिर्मिती यांचा एक प्रभावी संगम आहे. या योजनेमुळे टपाल सेवा अधिक लोकाभिमुख आणि परिणामकारक होणार असून, जास्तीत जास्त इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर विभागाचे डाकघर अधीक्षक आर. एस. बोटलावार यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी आपल्या जवळच्या मुख्य टपाल कार्यालयाशी किंवा विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

## अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई करणार - मंत्री प्रताप सरनाईक



मुंबई, दि. २ : अवैध प्रवासी वाहतूक रोखण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करणे गरजेचे असून अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला.

अवैध प्रवासी वाहतुकीस आळा घालण्यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली परिवहन विभागाच्या बांद्रा येथील कार्यालयात मोटार परिवहन विभाग व एसटी महामंडळाची उच्चस्तरीय आढावा बैठक झाली.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, अवैध वाहतूक रोखण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करणे अत्यावश्यक आहे. एसटीकडून उपलब्ध करून दिलेल्या वाहनांचा वापर केवळ कारवाईसाठीच करण्यात यावा. त्याचा कोणताही गैरवापर सहन केला जाणार नाही. तसेच, आर.टी.ओ.च्या सर्व ५९ कार्यालयांना आवश्यक संसाधने उपलब्ध करून देण्यासाठी एसटीने तातडीने कार्यवाही करावी. प्रत्येक संयुक्त कारवाईचा फोटो व लेखी अहवाल मुख्य कार्यालयात सादर करणे बंधनकारक असून, निष्क्रिय व जबाबदारी टाळणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिला.

एसटीने बेकायदेशीर मार्ग व वाहनांची माहिती नियमितपणे संकलित करून आर.टी.ओ. विभागास देणे, संगनमत व गैरप्रकारांविरोधात स्वतंत्र चौकशी समिती नेमणे, तसेच जीपीएस व फोटो रिपोर्टिंगसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून कारवाई अधिक पारदर्शक करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. अवैध प्रवासी वाहतूक रोखण्यासाठी परिवहन विभाग व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने संयुक्तपणे काम करण्यावर भर देण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

## औसा विधानसभा कार्यशाळेत मतदार यादी शुद्धीकरणावर भर; किरीट सोमय्या यांचे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन

औसा- औसा विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीच्या वतीने दि. २ एप्रिल रोजी औसा येथे आयोजित विधानसभास्तरीय कार्यशाळेत मतदार यादी विशेष सखोल पुनरावलोकन (ड्खठ) अभियान' अंतर्गत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन सत्र उत्साहात पार पडले. या कार्यशाळेत भाजपा नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या यांनी मतदार यादी शुद्धीकरण' (ड.ख.ठ.) या विषयावर कार्यकर्त्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.




कार्यक्रमाच्या सुरुवातीला औसा मतदारसंघाच्या वतीने किरीट सोमय्या यांचे मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी मतदार यादी अचूक व पारदर्शक ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित करत, मतदार यादी अचूक आणि सक्षम करणे ही लोकशाहीची मजबूत पायाभरणी आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन हे अभियान यशस्वी करावे, असे आवाहन केले.आपल्या भाषणात सोमय्या यांनी मागील १५ ते २० वर्षांतील वाढलेल्या मतदान टक्केवारीचा संदर्भ देत काही गंभीर मुद्दे उपस्थित केले. काही ठिकाणी बोगस मतदानाचा वापर झाल्याचा दावा करत, बांगलादेशी, पाकिस्तानी व रोहिंग्या घुसखोरांची नावे मतदार यादीत समाविष्ट होऊ नयेत, यासाठी मतदार यादी विशेष पुनरावलोकन (ड्खठ)' अभियान प्रभावीपणे राबवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच, आपल्या भागात खरे भारतीय मतदार आहेत का, याची सखोल पाहणी या अभियानांतर्गत करणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भारताला महासत्ता बनवण्याच्या स्वप्नाचा उल्लेख करत, ते स्वप्न साकार करण्यासाठी देशात शत-प्रतिशत भाजप सत्तेची आवश्यकता असल्याचे ठाम मत व्यक्त केले.कार्यक्रमात औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांनीही उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी देशाच्या विकासासाठी राज्य व केंद्रात भाजपची सत्ता कायम ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. देशाचा पंतप्रधान आणि राज्याचा मुख्यमंत्री निवडण्याचा अधिकार केवळ भारतीय नागरिकांना आहे. रोहिंग्या, बांगलादेशी किंवा पाकिस्तानी घुसखोरांना हा अधिकार नाही, असे स्पष्ट मत त्यांनी मांडले.

कार्यक्रमास प्रा. भीमाशंकर राचाटे, बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, पंचायत समिती सभापती गंगाबाई कोदळीकर, भाजपचे जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, माजी नगराध्यक्ष सुनील मिटकरी, सुनील उटगे, रवी चिलमे, सुभाष जाधव, नाना धुमाळ, काकासाहेब मोरे आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेमुळे औसा मतदारसंघात मतदार यादी शुद्धीकरण अभियानाला अधिक गती मिळणार असून, कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून हे अभियान यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भीमाशंकर राचाटे यांनी तर आभार सुनील मिटकरी यांनी व्यक्त केले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर डेंग यांनी केले.

## महाराष्ट्रात ई-वाहनांना चालना; शासनाकडून प्रोत्साहनपर निधी वितरित - मंत्री प्रताप सरनाईक



मुंबई, दि. २ : राज्यात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवून पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेला गती देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण-२०२५ अंतर्गत विविध घटकांना प्रोत्साहनपर निधी वितरित करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

या निर्णयानुसार राज्यातील प्रमुख शहरी वाहतूक उपक्रमांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. बेस्ट (मुंबई), नागपूर महानगरपालिका (छ्चढ), पुणे महानगरपालिका (झचझङ), कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका (छ्चचढ) आणि ठाणे महानगरपालिका (ढ्चढ) या सहा उपक्रमांना मिळून ४.५५ कोटींचा निधी देण्यात आला आहे. यामुळे शहरांमध्ये सार्वजनिक ई-वाहतूक अधिक सक्षम होणार आहे. ई-वाहनांच्या मागणीला चालना देण्यासाठी उत्पादक कंपन्यांना अनुदान देण्यात आले आहे. यात बजाज ऑटो लि., महिंद्रा इलेक्ट्रिक मोबिलिटी लि. आणि ऍीश्रशी मोटर्स प्रा. लि. यांना तीन चाकी वाहनांसाठी एकूण २.५१ कोटींहून अधिक निधी मंजूर करण्यात आला आहे.

याशिवाय, अथर एनर्जी प्रा.लि., टीव्हीएस मोटर कंपनी, चेतक टेक्नॉलॉजी आणि इतर कंपन्यांना ई-दुचाकी व ई-तीनचाकी वाहनांसाठी एकूण ४.४५ कोटींपेक्षा अधिक प्रोत्साहन रक्कम वितरित करण्यात येणार आहे.

तसेच सन. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ई-वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी २४६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील ई-वाहन क्षेत्राला मोठी चालना मिळणार असून, प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीनेही हा महत्त्वाचा टप्पा असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

## मतदार यादी विशेष सघन पुनरीक्षण कार्यक्रम ;तपशील अद्ययावत न केल्यास नाव वगळले जाण्याची शक्यता

लातूर, दि. २ (जिमाका): भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेनुसार, लातूर जिल्ह्यात 'विशेष सघन पुनरावलोकन' (SIR) कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात आहे. या मोहिमेतंर्गत मतदार यादीतील अस्पष्ट (ब्लअर) फोटो, डी.एस.ई., एस.आय.आर. मॅपिंग आणि नावातील दुरुस्ती ही कामे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फत केली जात आहेत. ३१ मार्च २०२६ ही मुदत संपल्यानंतरही हे काम सध्या सुरू असून, मतदारांनी प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक असल्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आतापर्यंत लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे मॅपिंगचे केवळ ५७ टक्के कामकाज पूर्ण झाले आहे. ज्या मतदारांचे मॅपिंग अद्याप झालेले नाही, त्यांना बीएलओमार्फत सुनावणीसाठी बोलावले जाईल. अशा सुनावणीस दोन ते तीन वेळा अनुपस्थित राहिल्यास किंवा आवश्यक पुरावे सादर न केल्यास संबंधित मतदाराचे नाव मतदार यादीतून थेट वगळले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे २३४-लातूर ग्रामीण आणि २३५-लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदारांनी आपल्या भागातील बीएलओंची प्रत्यक्ष भेट घेऊन आपली माहिती अद्ययावत करून घ्यावी.

या प्रक्रियेसाठी मतदारांनी सन २००२ च्या मतदार यादीतील स्वतःचे आई, वडील, आजी किंवा आजोबा यांचा तपशील https://voters.eci.gov.in/searchInSIR/SZU-4DPDF-JKSQWODSE या अधिकृत लिंकवर किंवा 'एउखछ्एढ' या पवर शोधून बीएलओ यांना उपलब्ध करून द्यावा. विवाहित महिलांनीदेखील त्यांच्या माहेरच्या (२००२ मधील) नातेवाईकांची माहिती देऊन प्रशासनास सहकार्य करावे. ही मोहीम मतदार यादी अधिक शुद्ध आणि त्रुटीरहित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची असून, नागरिकांनी आपले नाव मतदार यादीत कायम राखण्यासाठी तत्परतेने माहिती द्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

### सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षकांसाठी नामतालिका तयार करण्याची प्रक्रिया सुरु; ६ एप्रिलपासून ऑनलाईन अर्जाचे आवाहन

लातूर, दि. २ (जिमाका): महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१(१) (ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९ (१) (फ) मधील तरतुदीनुसार, सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठी सन २०२६-२०२८ या कालावधीची राज्यस्तरीय लेखापरिक्षकांची नवीन नामतालिका तयार करण्यात येणार आहे. या प्रक्रियेसाठी इच्छुक उमेदवारांकडून ६ एप्रिल ते २० एप्रिल २०२६ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. पात्र लेखापरिक्षकांनी https://mahasahakar.maharashtra.gov.in/en/ या संकेतस्थळावर जाऊन विहित मुदतीत आपले अर्ज सादर करावेत. ऑनलाईन अर्जासंदर्भातील सविस्तर परिपत्रकीय सूचना सहकार विभाग, सहकार आयुक्त व निबंधक यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच, या सूचनांची प्रत सर्व जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरिक्षक आणि विभागीय सहनिबंधक यांच्या कार्यालयामध्येही इच्छुकांच्या माहितीसाठी उपलब्ध आहे. तरी संबंधित व्यावसायिक आणि संस्थांनी या संधीचा लाभ घेऊन वेळेत अर्ज सादर करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हा उपनिबंधक व्ही. एल. पोतंगले यांनी केले आहे.

### विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचाबाह्यरुग्ण विभाग 0३ एप्रिल रोजी बंद राहणार

लातूर, दि. ०२ (जिमाका) : गुड फ्रायडेनिमित्त शुक्रवार, ३ एप्रिल, २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग शुक्रवार, ०३ एप्रिल, २०२६ रोजी बंद राहील. तसेच शनिवार, ४ एप्रिल, २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरुड यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.

## दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर मध्ये व्हर्च्युअल कॅम्पस ड्राइव्ह यशस्वी

लातूर, दि. : दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर येथे झायडस-कॅडिला, गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने व्हर्च्युअल कॅम्पस ड्राइव्हचे २८ मार्च २०२६ रोजी आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात महाविद्यालयातील डी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे व मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

या कॅम्पस ड्राइव्हच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नामांकित औषधनिर्मिती कंपनीत करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन माध्यमातून मुलाखती देत आपल्या ज्ञान व कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन केले. सदर निवड प्रक्रियेतून एकूण ११ विद्यार्थ्यांची पुढील फेरीसाठी निवड करण्यात आली असून, या विद्यार्थ्यांना फार्मास्युटिकल मॅन्युफॅक्चरिंग विभागात कार्य करण्याची संधी प्राप्त होणार आहे.

# अवकाळी पावसाचा कहर - शेतकऱ्यांच्या संकटाला दिलासा कधी?

## संपादकीय...

महाराष्ट्र राज्यात अलीकडील काळात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. रब्बी हंगामाच्या शेवटी, तसेच काढणीच्या तोंडावर आलेल्या पिकांवर या पावसाने अक्षरशः घाला घातला. गहू, हरभरा, कांदा, द्राक्षे, आंबा यांसारखी नगदी व अन्नधान्य पिके यामुळे बाधित झाली आहेत. अनेक ठिकाणी गारपिटीसह आलेल्या पावसाने उभे पीक जमिनीवर आडवे केले, तर काही ठिकाणी पाण्यामुळे पिकांची गुणवत्ता घसरली.

शेतकऱ्यांसाठी हा दुहेरी आघात ठरत आहे. एकीकडे उत्पादन खर्च वाढलेला असताना, दुसरीकडे हाती आलेले पीकही वाया जात असल्याने आर्थिक संकट अधिकच तीव्र झाले आहे. कर्जबाजारीपणात भर पडत असून, बाजारात योग्य दर मिळण्याची शक्यता देखील कमी झाली आहे. विशेषतः लहान व मध्यम शेतकरी या परिस्थितीत अधिक असुरक्षित ठरत आहेत.

सरकारने नुकसानीचे पंचनामे करून मदत जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू केली असली तरी ती अनेकदा अपुरी व विलंबाने मिळणारी ठरते. तात्काळ आणि पुरेशी मदत मिळणे ही काळाची गरज आहे. यासोबतच पीकविमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी, हवामान अंदाज प्रणाली सुधारणा, तसेच शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाधारित मार्गदर्शन देणे अत्यावश्यक आहे.

दीर्घकालीन उपाययोजनांमध्ये हवामान बदलाच्या पार्श्र्वभूमीवर शेती पद्धतीत बदल करणे, जलसंधारण, पीक विविधीकरण आणि संरक्षणात्मक शेती यांचा अवलंब करणे गरजेचे आहे. तसेच शेतमाल साठवणूक आणि प्रक्रिया उद्योगांना चालना दिल्यास शेतकऱ्यांचे नुकसान काही प्रमाणात कमी होऊ शकते.

अवकाळी पावसाचा वाढता धोका हा केवळ नैसर्गिक आपत्ती नसून तो धोरणात्मक आव्हान बनला आहे. त्यामुळे शासन, तज्ज्ञ आणि शेतकरी यांनी एकत्रितपणे उपाययोजना राबवणे आवश्यक आहे. अन्यथा, अन्नदाता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांचे भविष्य अधिकच अंधकारमय होण्याची भीती आहे. महाराष्ट्रात अवकाळी पावसाचे प्रमाण गेल्या काही वर्षांत लक्षणीय वाढले आहे. हवामान बदलाचा थेट परिणाम शेतीवर होत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

काढणीच्या तोंडावर आलेली पिके अचानक आलेल्या पावसामुळे नष्ट होत आहेत.यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडत आहे.गहू, हरभरा, ज्वारी यांसारखी रब्बी पिके मोठ्या प्रमाणावर बाधित झाली आहेत.

कांदा व द्राक्षांसारख्या नगदी पिकांनाही फटका बसला आहे.गारपीटीमुळे फळबागांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. पिकांची गुणवत्ता घसरल्याने बाजारात योग्य भाव मिळत नाही. शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने केलेली गुंतवणूक वाया जाते. बियाणे, खते, औषधे यांचा वाढलेला खर्च परत मिळत नाही. कर्जबाजारीपणाचा प्रश्र्न अधिक गंभीर बनतो. अनेक शेतकरी मानसिक तणावाखाली जात आहेत. सरकारकडून मदत जाहीर केली जाते, पण ती अपुरी ठरते. पंचनामे करण्यास उशीर होतो, त्यामुळे मदत विलंबाने मिळते. पीकविमा योजनांमध्येही अनेक अडचणी येतात. विमा कंपन्यांकडून दावे मंजूर होण्यास वेळ लागतो. हवामान अंदाज अचूक नसल्याने शेतकऱ्यांना पूर्वतयारी करता येत नाही. तंत्रज्ञानाचा वापर अजूनही सर्वांपर्यंत पोहोचलेला नाही. शेती पद्धतीत बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे. पीक विविधीकरण हा एक महत्त्वाचा उपाय ठरू शकतो.

जलसंधारणाच्या उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबवायला हव्यात.

# पुणे जिल्ह्यातील एमआयडीसीतील उद्योगांना पाईपद्वारे नैसर्गिक गॅस जोडणीसाठी मिशन मोडवर मोहीम - उद्योगमंत्री उदय सामंत

पुणे, : पुणे जिल्ह्यातील उद्योगांना अखंडित



आणि विश्र्वासार्ह ऊर्जा पुरवठा मिळावा यासाठी पाईपद्वारे नैसर्गिक गॅस (झछ्र) जोडणी शंभर टक्के पूर्ण करण्याच्या दृष्टीने मागेल त्या उद्योगाला जोडणी या तत्त्वावर मिशन मोडमध्ये विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याची घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली. यासाठी संबंधित विभागांनी परस्पर समन्वय साधून विशेष कॅम्पचे आयोजन करावे, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्र्वभूमीवर आयोजित उद्योग आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार (दूरदृश्य प्रणालीद्वारे), जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत, अपर पोलीस आयुक्त रंजन शर्मा, पुणे महानगरपालिकेचे अपर आयुक्त ओमप्रकाश दिवटे, तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संतोष भिसे, जिल्हा पुरवठा अधिकारी महेश सुधाळकर आणि विविध उद्योग संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उद्योगमंत्री श्री. सामंत म्हणाले की, सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीत उद्योगांची उत्पादन क्षमता अबाधित राखणे ही राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. नैसर्गिक गॅस हा उद्योगांसाठी स्वस्त, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक ऊर्जा स्रोत असल्याने कोणत्याही उद्योगाला केवळ गॅस जोडणीअभावी अडथळे निर्माण होऊ नयेत. त्यामुळे एमआयडीसी, गॅस वितरण कंपन्या आणि जिल्हा प्रशासन यांनी एकत्रितपणे नियोजन करून प्रत्येक पात्र उद्योगापर्यंत झछ्र जोडणी पोहोचवावी. एलपीजी गॅस पुरवठ्याबाबत त्यांनी स्पष्ट केले की, घरगुती गॅसला प्राधान्य दिले जात असून व्यावसायिक गॅसचा पुरवठा केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार केला जात आहे. कृत्रिम टंचाई निर्माण करून काळाबाजार करणाऱ्या एजन्सींवर जिल्हा प्रशासनाकडून कडक कारवाई करण्यात येईल. अशा प्रकारचे प्रकार आढळल्यास नागरिकांनी तात्काळ ११२ या टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन त्यांनी केले.

या मोहिमेंतर्गत जिल्हानिहाय व औद्योगिक वसाहतीनिहाय विशेष शिबिरे आयोजित करून अर्ज प्रक्रिया सुलभ करणे, तांत्रिक तपासणी जलद गतीने पूर्ण करणे आणि प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे यावर भर दिला जाणार आहे. इझ ऑफ डुइंग बिझनेसच्या दृष्टीने ही मोहीम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

रिनिव्हेबल ऊर्जा धोरणाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, उद्योगांना सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी एमआयडीसीमधील उपलब्ध जागा ३० वर्षांच्या दीर्घकालीन करारावर उपलब्ध करून दिली जाईल. त्यामुळे उद्योगांना वीज खर्चात बचत होऊन स्वयंपूर्ण ऊर्जाव्यवस्था उभारता येईल. इच्छुक उद्योगांनी पुढाकार घेतल्यास आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. उद्योगांसमोरील इतर अडचणींबाबत बोलताना त्यांनी जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग, महानगरपालिका आणि एमआयडीसी यांनी समन्वयाने काम करून उद्योगांसाठी सुरक्षित व अनुकूल वातावरण निर्माण करण्यावर भर दिला. लॉजिस्टिक, पायाभूत सुविधा आणि सुरक्षा यांचा समतोल राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, एमआयडीसी क्षेत्रातील अंतर्गत रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी सुमारे ३५० कोटी रुपयांची विकासकामे सुरू असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. हिंजवडी औद्योगिक परिसरात तात्पुरत्या मोबाईल टॉयलेटच्या ऐवजी कायमस्वरूपी स्वच्छतागृहांची उभारणी करण्यासाठी एमआयडीसीकडून जागा उपलब्ध करून देण्यात आली असून उद्योग संघटनांनी पुढाकार घेऊन ही सुविधा उभारावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच, पोलीस स्टेशनसाठी उपलब्ध करून दिलेल्या जागेवर उद्योग संघटनांनी बांधकाम करून सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम करावी, असे निर्देश देण्यात आले.

बारामती एमआयडीसीच्या धर्तीवर हिंजवडी, पिंपरी–चिंचवड आणि चाकण या औद्योगिक पट्ट्यांमध्ये जागतिक दर्जाचे कॉर्पोरेट गेस्ट हाऊस उभारण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला. यामुळे उद्योग प्रतिनिधी, गुंतवणूकदार आणि तज्ज्ञांना दर्जेदार सुविधा उपलब्ध होतील, असा विश्र्वास व्यक्त करण्यात आला. तसेच, ज्या ठिकाणी ट्रक टर्मिनलची आवश्यकता आहे, त्या ठिकाणी एमआयडीसीकडून जागा उपलब्ध करून संबंधित उद्योग संघटनांकडून त्याचे व्यवस्थापन करण्याची संकल्पनाही पुढे आली. युद्धजन्य परिस्थितीमुळे विशेषतः लघुउद्योगांवर आर्थिक ताण निर्माण झाल्याने वीज बिल भरण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी उद्योग संघटनांकडून करण्यात आली. या मागणीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्र्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले. उद्योगांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी प्रत्येक एमआयडीसी क्षेत्रात उद्योग प्रतिनिधी, जिल्हा प्रशासन आणि पोलीस यांच्यात समन्वय वाढविण्यासाठी व्हॉट्सअॅप गट स्थापन करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी उद्योगमंत्र्यांच्या निर्दे शानुसार लवकरच विशेष बैठक घेऊन या सर्व निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल, असे सांगितले.

# डोनाल्ड ट्रम्प मानवतेचा हत्यारा ही बाब अमेरिकेच्या ८० लक्ष नागरिकांनी जगाला पटवून दिली

जगात अनेक राजे–महाराजे झालेत, हिटलर सारखे क्रुर शासक सुद्धा झाले.परंतु डोनाल्ड ट्रम्प यांनी या संपूर्ण हद्दी पार करून मानव,पशुपक्षी, वित्तीय हाणी या संपूर्ण बाबींची हद्द पार केल्याचे दिसून येते.डोनाल्ड ट्रम्प यांनी आतापर्यंत अनेक देशांना रक्ताच्या लाथोळ्यात सोडून दगा दिला ही बाब जगजाहीर आहे आणि तेच काम अमेरिका इराण सोबत युद्ध करून इस्त्रायलच्या बाबतीत करू शकते. कारण अमेरिका कोणाचाच झाला नाही आणि होणार सुध्दा नाही ही बाब त्यांच्या वागणुकीवरून स्पष्ट दिसुन येते.अमेरिकेने सुपर पॉवरच्या नावाखाली जगाला अंधक्कारात नेवून ठेवले आहे व जगातील मित्र देशांना धोका देत आहे.डोनाल्ड ट्रम्प सांगतात की आम्ही जी कारवाई इराणवर करीत आहोत ही मानवतेच्या आणि जगाच्या कल्याणासाठी करीत आहो अशा भुलथापा मारून जगातील देशांची दिशाभूल करण्याचे काम डोनाल्ड ट्रम्प करीत आहे. डोनाल्ड ट्रम्प या युध्दाच्या माध्यमातून इराणला नमविण्याचा प्रयत्न करीत आहे.परंतु इराण अमेरिका–इस्त्रायलला जशास तसे उत्तर देवून दोघांनाही घाम सोडून त्यांची जागा दाखवित आहे.या युध्दामागचा अमेरिकेचा एकच उद्देश आहे तो मिडलिस्टमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित व्हावे व तेल कंपन्यांनवर आपला कब्जा व्हावा याकरीता इरानच्या ४५० किलो युरेनियमवर त्याचा डोळा आहे.कारण इराणने जर अनुबॉम्ब बनविला तर उत्तर कोरियाचा तानाशाह किंग्ज जॉन उन सारखी वारंवार धमकी इराण आपल्याला नेहमीच देईल अशी भिती अमेरिकेला वाटत आहे. त्याचप्रमाणे या युध्दाच्या माध्यमातून खर्ग आणि होर्मुझवर आपले वर्चस्व रहावे व खाडी देश आपल्या नियंत्रणात राहून तेल उद्योगांवर आपली पकड मजबूत करण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी हे विनाशकारी युद्ध छेडल्याचे दिसून येते.परंतु डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकडीपणामुळे आणि अतिरेकामुळे संपूर्ण मिडलिस्ट युद्धाच्या खाईत होरपळत आहे यात आबालवृद्ध, विद्यार्थी, मुल,निरअपराध नागरिक,पशुपक्षी यांना आपले प्राण मुकावे लागत आहे. या युध्दात इराणचा काहीच दोष नाही. अमेरिका आणि इस्त्रायलने इराणला मुद्दाम युद्धासाठी उकसविले आणि आज त्याचा जगावर विपरीत परिणाम होऊन आर्थिक, मानवीय, वित्तीय हाणी दिवसेंदिवस गंभीर वाढत आहे. सोबतच या युद्धामुळे रेडियेशन वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.अमेरिका आणि इस्त्रायलला वाटत होते की हे युद्ध ४ ते ५ दिवसांत संपेल परंतु इराण,अमेरिका–इस्त्रायलचा बाप निघाला आणि अनेक मोर्चावर अमेरिका–इस्त्रायलला परास्त करून जशास तसे उत्तर देत आहे ही इराणच्या दृष्टीने गौरवास्पद बाब आहे.कारण छोटासा देश बलाढ्य देशाला जेव्हा टक्कर देतो तेव्हा बलाढ्य देशांची घाबरगुंडी उडते.या संपूर्ण युद्धजन्य परिस्थिती वरून लक्षात येते की डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेतन्याहु यांनी सापाच्या बिळात हात टाकून मोठी चूक केली असावी.कारण आज एक महिना झाला तरी इराण अमेरिका–इस्त्रायलवर वार–पलटवार सुरूच आहे त्याच्या बहादुरीची सराहना केली पाहिजे. इराणचे टॉप लिएंडर व कमांडर मारल्या गेले तरीही इराण थोडासाही डगमगला नाही हा इराणचा प्लस पॉइंट आहे.माझ्यामते अमेरिकेने हे युद्ध ताबडतोब थांबविले पाहिजे अन्यथा इराण अमेरिकेला अनेक गंभीर जखमा देऊ शकतो.हे युद्ध थांबविण्यासाठी जगाने अमेरिका –इस्त्रायलवर दबाव टाकला पाहिजे.कारण या युध्दाचे समर्थन नाटोसह जगातील कोणीही करायला तयार नाही.इराण–अमेरिका–इस्त्रायल युद्ध दिवसेंदिवस अक्राळविक्राळ रूप घेत आहे आणि याचा परिणाम पुढे चालून महाभयानक होण्याची दाट शक्यता आहे.कारण अमेरिका–इजरायलने इराणला घायाळ करून अनेक जखमा दिल्या आहेत.त्यामुळे इराणकडून युद्ध थांबने शक्य नाही याकरिता हे युद्ध अमेरिकाच थांबवू शकतो अन्यथा याचा गंभीर परिणाम अमेरिका–इस्त्रायलसह मिडलिस्ट व संपूर्ण जगाला भोगावा लागेल.कारण अमेरिकन जनतेकडुन युद्धाचा कडाडून विरोध होत आहे याचाच अर्थ असा की, अमेरिकन जनता डोनाल्ड ट्रम्प यांच्या युध्दाच्या कारवाईच्या विरोधात असल्याचे स्पष्ट दिसून येते.गेल्या एक महिन्याच्या काळात युध्दामध्ये मृतांची सरकारी आकडेवारी हजारोंच्या संख्येने सांगितली जात असली तरी लाखोंच्या संख्येने मानवीय हाणी झाली आहे व अरबो–खरबो रूपयांची वित्तीय हाणी झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत घातक क्षेपणास्त्रे,ड्रोन आणि विध्वंसक शत्रसामुग्रीचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे हे सर्व विनाशकारीचे लक्षणं आहेत. पश्र्चिम आशियात जनुकाय क्षेपणास्त्र–ड्रोनचा पाऊस पडत आहे की काय असे सुरू आहे.ट्रम्पच्या चुकीच्या निर्णयामुळे अमेरिका–युरोपमध्ये ३३०० ठिकाणी डोनाल्ड ट्रम्पच्या विरोधात मोठ्या प्रमाणात निदर्शने सुरू आहे आणि याचे पडसाद जगभर उमटायला सुरुवात झाली आहे.डोनाल्ड ट्रम्प विरोधी आंदोलन फक्त अमेरिकेपुरते सिमित रहाले नसुन याचे पडसाद जगातील अनेक देशात पसरले आहे.कारण या युध्दाचा परिणाम बेरोजगारी व महागाईच्या रूपात जगातील प्रत्येक व्यक्तीवर पडत आहे. त्यामुळे सावधान ट्रम्प आतातरी युद्ध थांबवा अन्यथा जगाचा विनाश अटळ आहे.या युध्दात नाटोसह अनेक मित्र देशांनी डोनाल्ड ट्रम्पला मोठा धक्का दिला असून ठेंगा दाखवला आहे हीच डोनाल्ड ट्रम्पची मोठी हार आहे.अमेरिकेची दादागिरी लक्षात घेता सर्वच देशांनी इराणच्या बाजूने उभे रहायला हवे व शांततेने तोडगा काढायला हवा.अमेरिकेने इराणच्या अणू कार्यक्रमाच्या निगडित ठिकाणावर हल्ला केल्याने युद्ध आणखी चिघळले आहे.यामुळे इराणने अमेरिकी तेल कंपन्यांना टार्गेट करण्याची धमकी दिली आहे.यामुळे तेलाचे दर आभाळाला टेकण्याची दाट शक्यता आहे.अमेरिकेला मित्र देशांचे मोठे झटके पडत आहे अमेरिकेचे मित्र देश फ्रान्स, इटली, स्पेन आणि स्वित्झर्लंडने अमेरिकी सैन्य विमानांना आपले एअर बेस वापरण्यास नकार दिल्याने ट्रम्प एकाकी पडले आहेत आणि हा अमेरिकेसाठी मोठा झटका आहे. अमेरिकेला मित्र देशांकडून होर्मुझ सामुद्रधुनी संदर्भात मदत न मिळत असल्याने ट्रम्प तिलमिला झाले आहे आणि त्यांनी मित्र देशांना आपली नाराजी व्यक्त करत म्हटले आहे की,जा आणि स्वतः तेल मिळवा.कारण आमच्याकडे भरपूर तेल आहे. अमेरिकेने इराणच्या महत्वपूर्ण ठिकाणांवर हल्ला केल्याने इराणच्या तळपायाची आग मस्तकात गेली आहे त्यामुळे इराणने अमेरिकन कंपन्यांना लक्ष करण्यात येईल असा इशारा इराणच्या रिव्होल्युशनरी गार्डने (आयआरजी सी) दिला आहे.यात मायक्रोसॉफ्ट,गुगल,पल,इंटेल, आयबीएम, टेस्ला, आणि बोइंगसह १८ कंपन्यांचा यात समावेश असल्याचे वृत्त रॉयटर्सने दिले आहे.यावरून स्पष्ट होते की, अमेरिका इराणला जेवढे जखमा देईल त्यापेक्षा जास्त घाव आयआरजीसी अमेरिका व इस्त्रायलला देईल ही बाब स्पष्ट झाली आहे.त्यामुळे अमेरिकेने युध्दाला सुरुवात केली आणि आता त्यामुळे हे विनाशकारी युद्ध अमेरिकेनेच स्वतःच थांबविले पाहिजे.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# परशुराम जयंतीसाठी ब्राह्मण समाज एकवटणार लातूरात परशुराम जयंतीची जोरदार तयारी



लातूर :राजराजेश्वर भगवान परशुराम जन्मोत्सव सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने यंदाही उत्साहात साजरा करण्यात येणार असून हा उपक्रम आता तेराव्या वर्षात पदार्पण करत आहे. ज्येष्ठ विधीज्ञ अॅड. संजय पांडे यांनी सुरू केलेला हा उपक्रम गेल्या बारा वर्षांपासून सातत्याने राबवला जात आहे.यंदाच्या उत्सवात व्याख्यानमाला, रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, महिलांसाठी विविध उपक्रम तसेच समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. भगवान परशुराम मंदिरात यज्ञयागाचाही विशेष कार्यक्रम होणार आहे. समाजातील सर्व घटकांनी वर्षातून एकदा एकत्र येत परशुराम जयंती साजरी करावी, असा समितीचा मनोदय आहे.

यावर्षी प्रथमच वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले डॉ. संतोष देशपांडे यांची अध्यक्षपदी निवड झाली असून त्यांच्या नेतृत्वाखाली आणि ज्येष्ठांच्या मार्गदर्शनात मोठ्या प्रमाणावर उत्सव साजरा करण्याचे नियोजन आहे. सध्याच्या सामाजिक परिस्थितीत संघटित राहणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत ब्राह्मण सेवा संघ, लोकमान्य टिळक विचार मंच, माध्व मंडळ (उत्तरादी मठ), लक्ष्मी नृसिंह बचत गट, समर्थ अन्न सेवा, विद्यावर्धिनी प्रतिष्ठान, परशुराम सेवा संघ, पेशवा युवा मंच, ब्राह्मण ऐक्य परिषद, इझछ ग्रुप, बॉन्ड ऑर्गनायझेशन, पुरोहित संघ तसेच विविध महिला गट आणि अन्य संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत ङ्गअमृत योजनाफची माहिती समाजातील उद्योजकाना देण्याचे ठरले . तसेच इझछ महिला व पुरुष उद्योजकांसाठी प्रदर्शन भरविणे, १०० रक्तदात्यांचा संकल्प, तरुणांचा सहभाग वाढवणे आणि सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

दरम्यान, इझछ महिला मंडळाच्या वतीने आनंदाची बातमी देण्यात आली असून, लातूरमध्ये ब्राह्मवृंद परिवारासाठी विशेष शॉपिंग फेस्टिवल आयोजित करण्यात येणार आहे. या फेस्टिवलमध्ये इझछ समूहातील महिला व पुरुषांना त्यांच्या व्यवसायातील उत्पादने विक्रीसाठी स्टॉल लावण्याची संधी मिळणार असून हे इझछ मेंबर साठी स्टॉल पूर्णपणे मोफत असणार आहेत. स्टॉल बुकिंगसाठी अनुराधा औसेकर व धनश्री जोशी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जागा मर्यादित असल्याने लवकर नोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.एकूणच, परशुराम जयंती निमित्ताने समाज एकत्र आणण्याचा आणि सामाजिक उपक्रमांना चालना देण्याचा मोठा प्रयत्न यंदा पाहायला मिळणार आहे. अशी माहिती जयंती समितीचे अध्यक्ष डॉक्टर संतोष देशपांडे यांनी दिली आहे.

# राष्ट्रीय सेवा योजनेतून सेवाभाव जोपासा; नेतृत्व घडते - डॉ. मल्लिकार्जुन करजगी

लातूर (प्रतिनिधी) : भारत शिक्षण प्रसारक



मंडळ, लातूर यांच्या वतीने संचालित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय युवक–युवती नेतृत्व विकास शिबीर' उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाले. विविध उपक्रमांनी परिपूर्ण असलेल्या या शिबिराचा समारोप समारंभ नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला.

या समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. बालाजी घार हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे माजी संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, सुप्रसिद्ध कवी व गझलकार श्री. योगीराज माने, विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे माजी संचालक डॉ. दिगंबर नेटके, प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांची उपस्थिती लाभली. तसेच कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आपल्या मनामध्ये सेवावृत्ती जोपासली, तर त्यांच्यातून जबाबदार आणि सजग नागरिक घडतात. विद्यार्थी दशेत नेतृत्वाचे गुण विकसित झाले, तर अशा शिबिरांच्या माध्यमातून समाजाला विविध क्षेत्रांत सक्षम नेतृत्व मिळते. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात यशस्वी नेतृत्वाची पायाभरणी अशा उपक्रमांतूनच होत असते. त्यांच्या या विचारांनी विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव आणि नेतृत्वाची जाणीव अधिक दृढ झाली. यावेळी डॉ. दिगंबर नेटके यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, व्यक्तिमत्त्व विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना अत्यंत महत्त्वाची असून सेवा वृत्तीने केलेले कार्य विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास हातभार लावते. सुप्रसिद्ध कवी व गझलकार श्री. योगीराज माने यांनी आपल्या भाषणातून साहित्यिक दृष्टिकोन मांडत सांगितले की, कविता आणि गझल या सामाजिक जाणिवेतूनच जन्म घेतात. विद्यार्थ्यांमध्ये निस्वार्थ सेवा करण्याची भावना निर्माण झाली, तर ते केवळ चांगले नेतेच नव्हे, तर संवेदनशील साहित्यिकही घडू शकतात.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गीता वाघमारे यांनी प्रभावीपणे केले. प्रास्ताविक डॉ. केशव आलगुले यांनी सादर केले, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रमोद चव्हाण यांनी केले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. राजाभाऊ पवार, डॉ. अविनाश पवार, शितल पवार, डॉ. रामेश्र्वर स्वामी, प्रा. शिवराज बाजुळगे, प्रा. प्रज्ञा स्वाम, श्री. जाधव रामदास, श्री. बजरंग चिवडे, श्री. अमित भालके, श्री. मयूर आवळे, डॉ. राजाभाऊ पवार, डॉ. अविनाश पवार, शितल पवार, जयश्री जमादार आदींनी विशेष परिश्रम घेतले. या नेतृत्व विकास शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, सेवाभाव आणि नेतृत्व गुणांचा विकास होऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला नवी दिशा मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

**जांभेकरजी ..**

बाळकृष्ण जांभेकर
आपणा कोटी वंदन
पत्रकारितेत सुगंधी
आपणासम न चंदन
दे पहिले वर्तमानपत्र
दर्पण स्वरुपा दालन
उद्बोधक संग्रह्य लेख
समाजहितैषी लेखन
केले कित्येक विक्रम
छोटेसे जरीआयुर्मान
रॉयलसोसायटीमध्ये
पहिले भारतीविद्वान
पुस्तके अशी लिहिले
छात्रांना हो आकलन
शिलालेख न् ताम्रपट
अमूल्य केले संकलन
जाऊन खोल मुळाशी
करी सत्याचे उत्खनन
प्राचार्यलाडके शिकवे
गणितवाङ्मय विज्ञान
विषया ज्योतिष गहन
मिळवी अभ्यासू ज्ञान
अल्प वयी प्राध्यापक
परदेशी लाभला मान
बुध्दी न् स्मरण शक्ती
सर्वांगी सखोल वाचन
दहाभाषा तुझंअवगत
सहज करती विवेचन
मासिक चालवे पहिले
नाम तयाचे दिग्दर्शन
व्याकरणा देई कटाक्ष
अचूक हो शुद्धलेखन
बहुविध ज्ञान भांडारा
प्राविण्य करी संपादन
बहुआयामीव्यक्तिमत्त्व
करी विनम्र अभिवादन

**-- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

# महानगर प्रदेशातील गावांचे जीआईएस प्रणालीद्वारे सर्वेक्षणासाठी संबंधितांनी अचूक डाटा उपलब्ध करून द्यावा - विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

छत्रपती संभाजीनगर, (विमाका) ०२ : छत्रपती संभाजीनगर महानगर विकास प्राधिकरणामार्फत महानगर प्रदेशातील गावांचा भविष्यातील परिपूर्ण विकासासाठी, पायाभुत सुविधा उपलब्ध करण्यासाठी सल्लागार संस्थेची नियुक्ती करून त्यांच्या माध्यमातून जीआईएस प्रणालीद्वारे सर्वेक्षण सुरू आहे. यासाठी संबंधित सर्व विभागांनी आवश्यक तो अचूक डाटा उपलब्ध करून देण्याचे निर्देश महानगर आयुक्त तथा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले.

महानगर आयुक्त तथा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात अहवालाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अंकित, महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर तसेच नियोजन विभागासह संबंधित विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेशातील छत्रपती संभाजनगर जिल्हयातील छत्रपती संभाजीनगर, फुलंब्री, गंगापूर, पैठण, खुलताबाद या पाच तालुक्यातील एकूण ३११ गावांमधील भौतिक, सामाजिक व आर्थिक पायाभूत सुविधांचे निश्र्चित मानकांनुसार सखोल विश्र्लेषण करून जीआईएस प्रणालीच्या माध्यमातून सद्यस्थितीदर्शक नकाशे व सविस्तर अहवाल तयार करण्याचे काम प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले आहे.

या प्रकल्पासाठी पी. एन. शिधोरे सिव्हिल इंजिनिअर्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड या सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. या संस्थेव्दारे प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात प्राधिकरण हद्दीतील मौजे सहजापूर, बाळापूर, शेंद्रा जहांगीर, कागजीपुरा व फारोळा या पाच गावांचा पथदर्शी (झळश्रीं डींवू) स्वरूपात अभ्यास करण्यात आला असून त्याचा अहवाल प्राधिकरणास सादर करण्यात आला आहे. तर उर्वरित ३०६ गावांचे सर्वेक्षण पुढील टप्प्यात करण्यात येणार आहे.

यासाठी सल्लागार संस्थेचे प्रतिनिधी विविध शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच आस्थापनांकडून आवश्यक माहिती संकलित करणार असून आवश्यक त्या ठिकाणी छायाचित्रणासह स्थळपाहणी देखील करण्यात येणार आहे.

यासाठी संबंधित सर्व शासकीय कार्यालये, आस्थापना तसेच अधिकारी व कर्मचारी यांनी या संस्थेस आवश्यक माहिती तात्काळ उपलब्ध करून दयावेत. तसेच नागरिकांनीही या सर्वेक्षण कार्यास सकारात्मक प्रतिसाद देऊन सहकार्य करावे, असे आवाहन महानगर आयुक्त तथा विभागीय आयुक्त श्री. जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

# आरोग्य समृद्ध महाराष्ट्रासाठी लोकसहभागातून 'ग्रामीण आरोग्य' संपन्न करण्यावर भर द्यावा -मंत्री प्रकाश आबीटकर

पुणे,: 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे केवळ अभियान नसून ती एक व्यापक लोकचळवळ बनावी आणि लोकसहभागातून राज्यभर आरोग्याचा जागर व्हावा हेच या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या अभियानात उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देणे, ग्रामीण भागातील नागरिकांच्या सामुहिक वर्तणुकीत बदल घडविणे आणि आरोग्यदायी जीवनशैली रुजविण्यावर या मोहिमेत भर देण्यात आल्यामुळे लोकसहभागाच्या माध्यमातून आरोग्य संपन्न गाव करण्यावर भर द्यावा, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबीटकर यांनी केले.

या अभियानामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा व तालुका यंत्रणा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य उपकेंद्रे व या ठिकाणी कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्यसेवक, सेविका व आशा तसेच ग्रामस्थांचा सक्रीय सहभाग महत्वपूर्ण ठरणार आहे. एकात्मिक कार्यप्रणाली व पारदर्शक मूल्यांकन प्रणालीच्या आधारे, या अभियानातून गुणवत्तापूर्ण कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना आरोग्य संपन्न ग्राम म्हणून मानांकन व प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात येणार आहे, आरोग्य समृद्ध महाराष्ट्र घडविण्यासोबतच हे अभियान यशस्वी करण्यासाठी उत्स्फूर्तपणे पुढे यावे, असेही श्री. आबिटकर म्हणाले.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने जिल्हास्तरीय पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकरिता श्रीमती काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालय, सामान्य रुग्णालय येथे आयोजित 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' विभागीय कार्यशाळाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील, आरोग्य विभागाचे प्रधान डॉ. निपुण विनायक, सचिव ई. रविंद्रन, शहरी आयुक्त डॉ. सुनील भोकरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड, सिंहगड इन्स्टिट्यूटचे



संस्थापक अध्यक्ष डॉ. मारुती नवले आदी उपस्थित होते.

श्री. आबीटकर म्हणाले, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १० फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियान राबविण्याचा आणि त्याला आवश्यक ती निधीची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला. 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियानाला आज पासून सुरुवात करण्यात आली, या अभियानात ग्रामीण भागाचा चेहरा–मोहरा बदलण्यासोबतच लोकसहभागाच्या माध्यमाचा आरोग्याचा जागर करण्यात येणार आहे. हे एक शासकीय अभियान न राहता यामध्ये अधिकाधिक लोकसहभाग घेत व्यापक आरोग्य चळवळ निर्माण करण्याचा प्रयत्न करुया.

ग्रामीण महाराष्ट्राच्या आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासोबतच निरोगी जीवनशैलीच्या दृष्टीकोनातून नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी पुढाकार घ्यावा. अभियान यशस्वी करण्यासाठी विविध घटकांसोबत चर्चा करावी, त्यांच्या सूचनांचा स्वीकार करुन समन्वयाने काम करावे, आगामी काळात त्याप्रमाणे आवश्यक ते बदल करण्यात येतील.

राज्यातील एकही नागरिक आरोग्य योजनांपासून वंचित राहू नये, यासाठी सर्वांनी कटिबद्धतेने काम करावे. हे अभियान आपल्या नागरिकांच्या आरोग्यदायी भविष्यासाठी राबविण्यात येत असून, ती चळवळ म्हणून यशस्वी करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. या अभियानाच्या यशासाठी आरोग्य विभागामार्फत आवश्यक सहकार्य करण्यात येईल.

राज्याच्या आरोग्य विभागाच्या माध्यातून नागरिकांना मोफत आरोग्य सेवा देण्यात येत आहे. गावपातळीपर्यंत आरोग्य सुविधा बळकटीकरणावर भर देण्यात आले. विभागामार्फत एकात्मिक आयुष्यमान भारत–प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांसारख्या राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती तळागळापर्यंत पोहोचवून नागरिकांना आरोग्य सुविधा दिल्या देण्याचे काम करावे. योजना यशस्वी करण्याकरिता लोकसहभागाची चळवळ म्हणून पुढे आले पाहिजे.

नवीन पिढीच्या सुरक्षिततेसाठी आणि कर्करोगासारख्या आजाराला रोखण्याकरिता राज्यातील १४ वर्षे वयोगटातील ९ लाख ८४ हजार मुलींचे (ज्यांनी चौदावा वाढदिवस साजरा केला आहे परंतु पंधरावा वाढदिवस अद्याप झालेला नाही) मोफत लसीकरण करण्याचा कार्यक्रम सुरु आहे. या लसीकरणाबाबत व्यापक स्वरुपात जनजागृती करावी. शिबीराला भेटी देवून माहिती घ्यावी, असे आवाहन श्री. आबीटकर म्हणाले.

श्री. जगदाळे म्हणाले, पुणे जिल्ह्यात 'मॉडेल पीएचसी'च्या माध्यमातून चांगली आरोग्य सेवा देण्याची सुरुवात करण्यात आली आहे. त्यासाठी ग्रामीण स्तरावर रुग्ण कल्याण समितीची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या समित्या पुन्हा कार्यान्वित कराव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

डॉ. विनायक यांनी 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियानाविषयी माहिती देवून ते पुढे म्हणाले, आरोग्य ही केवळ वैयक्तिक बाब नव्हे तर सार्वजनिक बाब आहे, त्यामुळे आरोग्य विभागामार्फत आरोग्य विषयाला केंद्रबिंदू मानून विविध आरोग्य विषय योजना मोहिम स्वरुपात राबविण्यात येत आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्य विषयक समस्या सोडविण्याकरिता तळागळापर्यंत पोहोचवून काम करावे, येत्या काळात हे अभियान शहरी भागात राबविण्यात येईल, असेही डॉ. विनायक म्हणाले.

श्री. पाटील म्हणाले, ग्रामीण भागात आरोग्य विषयावर व्यापक स्वरुपात जनजागृतीची आवश्यकता आहे. अभियानाची अंमलबजावणी, नियोजन आणि विविध स्तरांवरील जबाबदाऱ्या याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले.

यावेळी श्री.आबीटकर यांच्या हस्ते 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियान संदर्भात माहिती पुस्तिकेचे तसेच गीताचे अनावरण करण्यात आले. तसेच अभियानाच्या जनजागृतीकरिता चित्ररथाचा फित कापून शुभारंभ करण्यात आला. यावेळी कार्यशाळेत अभियान अंमलबजावणीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीबाबत संबंधित जिल्हा प्रतिनिधींनी माहिती दिली.

या कार्यशाळेत पुणे विभागातील सर्व परिमंडळातील उपसंचालक, जिल्हा आरोग्य शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने या कार्यशाळेला उपस्थित होते. तसेच मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, सांगली जिल्ह्यातील आरोग्य विभागाचे पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी सहभागी होते.

## श्री श्री रविशंकर विद्यामंदिर, लातूरच्या थ्रो बॉल संघाची राज्यस्तरावर धडक; विभागीय स्पर्धेत मुलींच्या संघाचे दैदिप्यमान यश

लातूर : क्रीडा व युवक सेवा



संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'विभागीय शालेय थ्रो बॉल स्पर्धा २०२५–२६' मध्ये लातूरच्या श्री श्री रविशंकर विद्यामंदिरच्या खेळाडूंनी आपल्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर मोठे यश संपादन केले आहे. या स्पर्धेत विद्यालयाच्या १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक, तर १४ वर्षाखालील मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपली जागा निश्र्चित केली आहे.

नांदेड येथे पार पडलेल्या या अटीतटीच्या सामन्यांमध्ये विद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट ताळमेळ आणि चिकाटीचे प्रदर्शन केले. विशेषतः १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने प्रतिस्पर्धी धाराशिव संघांना पराभूत करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. या यशामुळे श्री श्री रविशंकर विद्यामंदिर आणि लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

विजयी खेळाडूंची नावे: १. संस्कृती शिवराम मलवाडे (संघनायक) २. अपूर्वा महेश गडगडे (उपसंघनायक) ३. श्रुती गोविंद कुंभार ४. वसुंधरा तानाजी सोनवणे ५. सायली दत्तात्रय धारेकर ६. श्रावणी प्रदीप पंडित ७. अन्वी विनोद डोंगरे ८. श्रावणी लिंबराज चिवडे ९. स्वरा राहुल चव्हाण १०. समृद्धी बालाजी गायकवाड ११. सिद्धी श्रीकृष्ण गडदे १२. हर्षदा चंद्रकांत मोरे

विभागीय स्तरावर चमकदार कामगिरी केल्यानंतर, आता हे १९ वर्षांखालील संघ राज्यस्तरीय थ्रो बॉल स्पर्धेसाठी सज्ज झाले आहेत. ही राज्यस्तरीय स्पर्धा ७ एप्रिल रोजी नांदेड येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतही आपले खेळाडू लातूरचे नाव उंचावतील, असा विश्र्वास क्रीडा शिक्षकांनी व्यक्त केला आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. श्री राजेंद्र कोळगे, संचालक सदस्या सौ. सुनंदा कोळगे, विद्यालयाचे मुख्याध्यापिका सौ. सोनाली कुलकर्णी उपमुख्याध्यापिका सौ. सुलभा जोशी, कार्यालयिन व्यवस्थापक श्री आशिष कोळगे, क्रीडा शिक्षक सौ. शिला सलगरे श्री दिनेश मानके श्री नरेंद्र स्वामी, प्रशिक्षक अप्पासाहेब स्वामी आणि पालकांनी सर्व खेळाडूंचे व त्यांच्या प्रशिक्षकांचे कौतुक करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# डोंगरी भागातील लोकांना विविध ठिकाणच्या संस्कृतींची अनुभूती देणारा 'कोयना दौलत डोंगरी महोत्सव' - पालकमंत्री शंभूराज देसाई

सातारा दि. २ : मरळी तालुका पाटण येथे आयोजित कोयना–दौलत डोंगरी महोत्सवाच्या निमित्ताने डोंगरी भागातील लोकांना विविध ठिकाणच्या संस्कृतींची अनुभूती देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. यानिमित्ताने या परिसरातील नागरिकांना जागतिक दर्जाच्या पर्यटन सुविधांचाही अनुभव घेता येणार असल्याचे प्रतिपादन पर्यटन मंत्री तथा पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केले.




कोयना–दौलत डोगरी महोत्सवाचे उद्घाटन पाटण तालुक्यातील नाडे येथे पालकमंत्री श्री. देसाई यांच्याहस्ते झाले. यावेळी जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशानी नागराजन, प्रभारी जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर, पंचायत समिती सभापती सरिता पवार, उपसभापती विजय पवार, श्रीमती विजयादेवी देसाई, लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष यशराज देसाई, मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रवीराज देसाई, प्रांताधिकारी सोपान टोणपे, तहसीलदार अनंत गुरव आदी उपस्थित होते.

पालकमंत्री देसाई म्हणाले, या महोत्सवाच्या निमिताने डोंगरी भागातील नागरीकांना पर्यटनासोबतच राज्यातील विविध भागातील खाद्यसंस्कृती, कला यांचाही अनुभव महोत्सव कालावधीत घेता येणार आहे. तसेच शेतकरी बांधवांसाठी कृषी प्रदर्शन, पशुपक्षी प्रदर्शनाचे आयोजनही करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये महिला बचत गटांचे स्टॉल उभारण्यात आले आहेत. याशिवाय बोटिंग, पॅराग्लायडिंग, संगीत कारंजे, लेझर शो, घोडा व उंट सफारी यांचाही अनुभव घेता येणार आहे.

नागरीकांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही पालकमंत्री देसाई यांनी यावेळी केले.

तसेच २ ते ६ एप्रिल दरम्यान होणाऱ्या या महोत्सवामध्ये शस्त्र प्रदर्शन, लावणी महोत्सव, पोवाडा सादरीकरण, मर्दानी खेळ, भजन किर्तन, ब्रास बँड पथक, हिंदी व मराठी संगीताचा सांस्कृतिक कार्यक्रम यांचाही समावेश आहे. या कार्यक्रमांचाही लाभ घ्यावा, असे सांगून महोत्सवादरम्यान सर्वांनी शिस्तीचे पालन करावे, महिला, लहान मुले, वृद्ध यांना कोणत्याही पद्धतीचा त्रास होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी असेही आवाहन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा परिषद शाळा नाडेच्या विद्यार्थ्यांनी शौर्य गीत सादर केले. तसेच उद्घाटन कार्यक्रम समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांनी मर्दानी खेळांचे सादरीकरणही केले. यावेळी परिसरातील नागरिक विविध पदाधिकारी, अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संजय राऊतांनी आधी शिवरायांच्या वंशजांची माफी मागावी आणि मगच इतिहासावर बोलावे भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांचा घणाघात

मुंबई : सरसेनापती हंबीरराव मोहितेंच्या कन्या ताराराणी यांच्याबद्दल जैन मुनींनी केलेल्या वक्तव्याचे कोणीही समर्थन करत नाही. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशाचे पुरावे संजय राऊतांनी मागितले होते. छत्रपती शिवरायांच्या वंशजांचे पुरावे मागितल्याबद्दल संजय राऊतांनी जाहीर माफी मागावी आणि मगच मराठा साम्राज्याच्या गौरवशाली इतिहासावर बोलावे असा घणाघात भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी बुधवारी केला.

श्री. बन यांनी सांगितले की, संजय राऊत, तुम्ही कधीच धर्मांतर केले आहे. म्हणूनच राऊत यांनी विनाकारण हिंदू धर्म, महाराष्ट्र धर्म आणि मराठा धर्माबद्दल बोलू नये. सत्तेसाठी औरंगजेबाचा धर्म स्वीकारणाऱ्यांनी धर्मांतर आणि धर्माच्या गोष्टी करू नयेत. तो अधिकार त्यांनी कधीच गमावलेला आहे.

महाराष्ट्र सरकार षंढ नाही. संजय राऊत हे षंढ आहेत अशा शब्दात वाभाडे काढत श्री. बन यांनी महाराष्ट्र राज्य हे देवाभाऊंच्या नेतृत्वात पुढे जात असून अशा पद्धतीने जो भडक वक्तव्य करेल त्याच्यावर निश्र्चितपणे कारवाई केली जाईल, असे ठणकावून सांगितले. संजय राऊत जनतेमधून निवडून येऊ शकत नाहीत. उबाठा गटाला त्याची जागा दाखवण्याचे काम महाराष्ट्रातल्या जनतेने विधानसभा, महापालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत केल्याने खऱ्या अर्थाने षंढ कोण आहे याचा दाखला महाराष्ट्राने दिल्याचे श्री. बन म्हणाले.

भारतीय जनता पार्टीचे नेते व राज्याचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांना महाराष्ट्राचा इतिहास माहित आहे. पण संजय राऊत तुम्हाला महाराष्ट्राचा इतिहास ठाऊक आहे का ते आधी सांगा. मंगल प्रभात लोढा यांनी राऊतांसारखा पत्राचाळीमध्ये घोटाळा केला नाही. त्यांनी मराठी माणसांची घरे लुटून स्वतःचे घर भरले नाही. त्यांना शंभर दिवसाचा तुरुंगवास झाला नाही. मराठी माणसांची घरे लुटायची. पत्रा चाळीमध्ये घोटाळा करायचा हा ज्यांचा इतिहास आहे त्या संजय राऊत यांनी आधी स्वतःचा इतिहास बघावा, अशा शब्दात श्री. बन यांनी राऊत यांना फटकारले.

महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार ठेकेदारांचे नाही तर जनतेचे सरकार आहे, असे ठणकावून सांगतानाच आम्ही ठेकेदारी करतो ती जनतेची करतो. आम्ही जनतेला उत्तरदायी आहोत. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना ठेकेदार हे सरकार चालवायचे. कोरोना काळात महाविकास आघाडीच्या लोकांनी कोट्यवधी कमावले. संजय राऊतांनी खिचडी आणि कफन चोरीमध्येही घोटाळा केला. या दलालीमुळेच राऊतांनी तुरुंगवासही भोगला होता हे जरा ध्यानात ठेवा, असेही श्री. बन यांनी सुनावले.

# सेवालयाच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय स्पर्धेत यश

लातूर : सोलापूर येथे झालेल्या पहिल्या राज्यस्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सव स्पर्धेत हासेगावच्या सेवालय बालगृहातील एचआयव्ही संक्रमित अनाथ विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन एका सुवर्णपदकासह अन्य पारितोषिके पटकावत यश संपादन केले आहे.



राज्य शासनाचा महिला व बाल कल्याण विभाग व सोलापूर येथील सिंहगड इन्स्टिट्यूटच्यावतीने पहिल्यांदाच राज्यस्तरी चाचा नेहरू बाल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात राज्यभरातून ९०० पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. त्यात छत्रपती संभाजीनगर विभागातून निवड झालेल्या हासेगावच्या सेवालय बालगृहातील मुलांनी लातूर जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व केले. लातूर जिल्ह्यातून एकूण ८ स्पर्धक सहभागी झाले होते. त्यात एकट्या सेवालय बालगृहातील ५ मुलांचा समावेश होता.

या महोत्सवात सेवालातील विद्यार्थ्यांनी निबंध, चित्रकला, वक्तृत्व, बुध्दिबळ, कॅरम, खो–खो, सुंदर हस्ताक्षर, मशाल धाव, रिले या स्पर्धांमध्ये सहभागी होत विजय मिळविले आहेत.

सेवालयातील मुले ही एचआयव्ही संक्रमित आहेत. सर्वसामान्यांप्रमाणेच या विद्यार्थ्यांनीही स्पर्धेत सहभागी होऊन चाचा नेहरू महोत्सवात आपली मोहोर उमटविली आहे.

मुलांच्या या यशाबद्दल सेवालय बालगृहाचे संस्थापक प्रा. रवी बापटले यांच्यासह, प्रा. शैलजा बरुरे, प्रा. मनोज मोठे, रचना बापटणे, अधीक्षिका पूजा जयगावकर यांनी कौतुक केले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानातून विश्र्वासनिर्मिती व्हावी- मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



मुंबई, दि. ०२ : राज्यातील नागरिकांना महसूल सेवा सुलभ, वेगवान आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान राज्यभर प्रभावीपणे राबविले जावे. या अभियानांतर्गत आयोजित केल्या जाणाऱ्या शिबिरांमध्ये जनसामान्यांची महत्वपूर्ण कामे करण्यास प्राधान्य देण्याचे स्पष्ट निर्देश राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यस्तरीय समितीच्या आढावा बैठकीदरम्यान दिले.

मंत्रालयात झालेल्या या बैठकीस राज्यमंत्री योगेश कदम, अपर मुख्य सचिव विकास खारगे, संबंधित अधिकारी आणि आमदार उपस्थित होते. दि. ७ आणि १४ मार्च रोजी पार पडलेल्या या अभियानाचा पहिला टप्पा यशस्वी झाला असून, याद्वारे लाखो नागरिकांची प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यात आली आहेत. महसूल विभागाशी संबंधित लोकांची केवळ किरकोळ स्वरूपाची नव्हे तर महत्वाच्या कामांचाही प्राधान्याने निपटारा होईल, यादृष्टीने शिबिरांचे नियोजन करण्याचे निर्देश मंत्री श्री. बावनकुळे यांनी यावेळी दिले.

छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानांतर्गत राज्यभर शिबिरांचे नियोजन करण्यात आले आहे. त्याचा सविस्तर आढावा घेताना महसूल मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले की, या अभियानाच्या माध्यमातून लोकांमध्ये शासनाविषयी विश्र्वास निर्माण होण्यास मदत होत आहे. हे अभियान म्हणजे केवळ प्रशासकीय उपक्रम नसून नागरिकांच्या विश्र्वासाशी निगडित आहे. त्यामुळे संपूर्ण महसूल यंत्रणेने हे अभियान गांभीर्याने घ्यावे, शिबिरांचे नियोजन आणि सामान्य नागरिकांची कामे प्राधान्याने करावीत. शेतकऱ्यांपासून थेट शहरी नागरिकांपर्यंत महसूल सेवा अधिक तत्पर आणि वेगवान झाल्याची भावना नागरिकांमध्ये रुजावी, या दृष्टीने प्रत्येक शिबीर पार पाडले जावे, असे निर्देश त्यांनी दिले.

गावपातळीवर आयोजित राजस्व शिबिरांमध्ये एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत नागरिकांच्या ५७,१५२ अर्जांचा त्वरीत निपटारा करण्यात आला. यामध्ये ४४,७७६ फेरफार प्रकरणे निकाली करून जमिनीच्या मालकीच्या नोंदी अद्ययावत करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर १७,४१४ सातबारा दुरुस्तीसाठी स्वीकारलेले अर्जदेखील त्वरीत निकाली काढण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

अभियानात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत १,९०,१६२ डिजिटल सातबारा, १,२२,७३९ आठअ उतारे आणि २,४६,४५३ प्रमाणपत्रे नागरिकांना वाटप करण्यात आली. यामुळे नागरिकांना संबंधित कार्यालयात जाऊन वेळ खर्ची घालावा लागला नाही. ऑनलाइनडिजिटल दस्तऐवज तत्काळ मिळू शकले. भूसंपादन प्रकरणे आणि अकृषक परवानगीच्या अनुक्रमे २,६९९ आणि १,०४७ प्रकरणांमध्ये कमीजास्त पत्रकांची तयारी करून गाव दप्तर अद्ययावत करण्यात आले असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी अभियानाच्या प्रगतीचा जिल्हानिहाय आढावादेखील घेतला. शिबिरांमध्ये येणाऱ्या प्रत्येक अर्जावर ठराविक वेळेत निर्णय घ्यावा. तसेच नागरिकांना अनावश्यक त्रास होऊ नये, याची विशेष दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. तसेच लोकांपर्यंत या शिबिरांची माहिती पोहोचावी यासाठी व्यापक जनजागृती करावी. शिबिरांमध्ये जमिनीच्या नोंदी, फेरफार, वारस नोंद आणि इतर प्रलंबित प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यावर यंत्रणेने विशेष भर द्यावा, असे निर्देशही मंत्री श्री. बावनकुळे यांनी यावेळी दिले.

## उद्धवजींच्या आमदारकीसाठी संजय राऊतांना सोनियांसमोर मुजरा करावा लागणार भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांचा प्रहार

मुंबई : उद्धव ठाकरे यांनी विधिमंडळात जावे असे संजय राऊत यांना वाटत असले तरी ते विधिमंडळात जातील का नाही ते काँग्रेस ठरवणार आहे. काँग्रेसने उपकार केले तरच उद्धव ठाकरेंना आमदारकी मिळणार आहे. उबाठा अस्तित्वात येण्याआधी शिवसेना ही भारतीय जनता पार्टीसोबत होती तेव्हा तुम्हाला स्वाभिमान आणि सन्मान होता. परंतु आता तुम्ही स्वाभिमान काँग्रेसकडे गहाण ठेवला आहे. आमदारकीसाठी सोनिया गांधीसमोर जाऊन मुजरा करावा लागणार आहे हे लक्षात ठेवा, अशा शब्दात भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी संजय राऊत यांच्यावर गुरुवारी सडकून टीका केली. शिवसेना आणि राष्ट्रवादी कुणाची याचा निकाल जनतेनेच दिला आहे. विधानसभा, जिल्हा परिषद आणि महापालिका या तिन्ही निवडणुकांमध्ये जनतेने खरी शिवसेना एकनाथ शिंदे यांची आणि खरी राष्ट्रवादी अजितदादा पवार, सुनेत्राताई पवार यांची असल्यावर शिक्कामोर्तब केले आहे. आता न्यायालयातून निकाल येईल. मात्र संजय राऊत आणि उबाठा गटाचा आता शिवसेना आणि धनुष्यबाणावर हक्क उरलेला नाही. हिंदुत्वाशी गद्दारी केल्यानेच जनतेने तुम्हाला नाकारले आहे, याची आठवण श्री. बन यांनी राऊत यांना करून दिली. कोण रामशास्त्री आहे आणि कोण कामशास्त्री आहे हे सांगण्याच्या भानगडीत संजय राऊत यांनी पडू नये. कारण संजय राऊत आणि उबाठा गट स्वतः हरामशास्त्री आहे. कामशास्त्रामध्ये तर संजय राऊतांची पीएचडी झाली आहे. अलिबागच्या बंगल्यामध्ये संजय राऊत नेमके काय काय करतात हे लोकांसमोर आले तर संजय राऊतांना तोंड दाखवता येणार नाही. इतरांना तोंड उघडायला लावू नका तुमचे तोंड काळे झाल्याशिवाय राहणार नाही, असे श्री. बन यांनी सुनावले. श्री. बन म्हणाले की, देवेंद्रजी फडणवीस यांनी काय बोलावे हे सांगण्याच्या भानगडीत राऊतांनी पडू नये. बाळासाहेबांचे विचार सोडून आणि सौदेबाजी करून तुम्ही तुमचा अख्खा पक्ष काँग्रेसला विकला. आपल्याला राज्यसभेची खासदारकी मिळावी यासाठी राहुल गांधीसोबत सौदेबाजी करण्याचे काम संजय राऊत यांनी केले. देवेंद्रजी फडणवीस हे हिंदुत्वादाचे पाईक आहेत. ते तीनवेळा मागच्या दाराने नव्हे तर जनतेच्या आशीर्वादाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यांना कुणाशी काय कसे बोलायचे हे माहित आहे. परंतु तुम्ही तोंड उघडले की गटारगंगा बाहेर येते. त्याकडे जरा लक्ष द्या. भोंदूबाा खरात लोकांना फसवायचा तसे संजूबाबा राऊत हे भविष्यवाणी सांगून लोकांना फसवण्याचे काम करत आहेत. भारतीय जनता पार्टीमध्ये कोणता पक्ष विलीन होईल, कोण कुठे जाईल हे सांगण्याच्या भानगडीत संजय राऊत यांनी पडू नये कारण उबाठा गट काँग्रेसमध्ये विलीन होणार आहे

# मंत्रिमंडळ निर्णय

### साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी १ हजार २३४ कोटी रुपयांची तरतूद

अहिल्यानगर जिल्ह्यातील चिखली (ता.श्रीगोंदा) तालुक्यातील साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी १ हजार २३४ कोटी १३ लाख रुपयांच्या तरतुदीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

साकळाई उपसा सिंचन योजना घोड धरणाच्या जलाशयावरील म्हसे या गावात उभी केली जाणार आहे. म्हसे गाव येथून चार टप्प्यांमध्ये पाणी उचलून ते श्रीगोंदा व अहिल्यानगर या दोन तालुक्यातील ३२ गावांसाठी वापरता येणार आहे. यामुळे या अवर्षणग्रस्त गावांना पिण्याच्या पाण्यासह सुमारे ९ हजार ६०० हेक्टर क्षेत्रास सिंचन उपलब्ध होणार आहे. या योजनेत लाभक्षेत्रात विकेंद्रीत जलसाठे निर्माण केले जाणार आहेत. त्यामध्ये ल. पा. तलाव, पाझर तलाव, सिमेंट नाला बंधारे व गाव तलावांचा वापर केला जाणार आहे. या योजनेमुळे सिंचनासाठी १.६० टीएमसी व पिण्यासाठी ०.२० टीएमसी असा एकूण १.८० टीएमसी उपलब्ध होणार आहे.

महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापन

### राज्यातील ५४ नदी प्रदूषित पट्ट्यांबाबत पुनरूज्जीवन प्रकल्प राबविणार

राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी आणि नदी संवर्धन–पुनरूज्जीवन करण्यासाठी नियामक आणि विकासात्मक अशी दोन्ही कामे करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नदी पुनरूज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेच्या धर्तीवर राज्यात स्थापन करण्यात येणाऱ्या या प्राधिकरणाचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतील, तर उपाध्यक्ष पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री असतील. वित्त मंत्री, नगरविकास मंत्री, जलसंपदा मंत्री, उद्योग मंत्री, ग्रामविकास व पंचायतीराज मंत्री सदस्य असतील पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे सचिव हे सदस्य–सचिव असतील.

भारतात १० प्रमुख नद्या आहेत. त्यापैकी नर्मदा, तापी, गोदावरी व कृष्णा या महाराष्ट्रात आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०२५ मध्ये प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार देशभरात २९६ प्रदूषित नदी–पट्टे असून त्यापैकी सर्वाधिक प्रदूषित नदी–पट्टे ५४ महाराष्ट्रात आहेत. यात मिठी, काळू, मुळा, मुळा–मुठा, मुठा, भीमा, पवना, नाग, चंद्रभागा, पंचगंगा अशा नद्यांचे प्रदूषण–पुनरूज्जीवन याबाबत निर्णय घेता येणार आहे. त्यानुषंगाने नदी पुनरूज्जीवनाच्या सर्व पैलूंना चालना देणारी प्रमुख संस्था–नोडल एजन्सी म्हणून तसेच सर्वोच्च निर्णय घेण्यासाठी प्राधिकरण काम करणार आहे.

प्राधिकरण या ५४ प्रदूषित नदी पट्टयांसाठी पुनरूज्जीवनासाठी टप्प्याटप्प्याने प्राधान्यक्रम निश्र्चित करेल. विविध योजनांचे एकत्रिकरण करून पूरक धोरणांची म्हणजेच सांडपाणी प्रक्रिया, औद्योगिक सांडपाण्यासंबंधात उपाययोजना, अतिक्रमणे रोखण्यासाठी नदीकाठचे क्षेत्र निश्र्चित करण्यासाठी शिफारस करेल. प्राधिकरण अंमलबजावणीसाठी विविध विभागांदरम्यान समन्वय साधेल तसेच जनजागृती, लोकसहभाग वाढविण्यासाठी आराखडे तयार करेल. नदी खोरे व्यवस्थापन आराखडे तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे, भूसंपादन, अतिक्रमणे, वीजपुरवठा आणि करारांचे प्रश्र्न सोडविण्याची जबाबदारी या प्राधिकरणाकडे असेल. प्राधिकरणात पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समिती तसेच एक समर्पित सचिवालयही काम करणार आहे. या सचिवालयात विविध स्वयंसेवी संस्था, पर्यावरण व जैवविविधता क्षेत्रात काम करणाऱ्या बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी–बीएनएचएस, मॅन्ग्रोव्ह सेल अशा संस्थांचाही समावेश असेल.




प्राधिकरणासाठी आवश्यक २ हजार कोटींचा निधी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून उभारण्यास तसेच शासनाचे योगदान म्हणून १०० कोटींचा निधी देण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच गौण खनिज उत्खननातून मिळणाऱ्या रकमेच्या १० टक्के इतका निधी दरवर्षी प्राधिकरणास देण्यास मान्यता देण्यात आली. याशिवाय विविध कंपन्यांकडून मिळणारा सामाजिक दायित्व निधी, विविध वित्तीय संस्थांकडून होणारा मिश्र वित्त पुरवठा या माध्यमातून प्राधिकरणासाठी निधी उभारला जाणार आहे.

### अमरावती महापालिकेला क्रीडा संकुलासाठी मौजे नवसारी येथील जमीन

अमरावती महापालिकेला क्रीडा संकुलासाठी मौजे नवसारी येथील १६ हजार ७०८ चौ.मी.जमीन देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

अमरावती महानगरपालिकेला क्रीडा संकुलासाठी ही जमीन देण्यात आली होती. आता या जमिनीचा अंतिम ताबा देण्यास तसेच आतापर्यंत केलेल्या वाणिज्य वापरासाठी आकारण्यात आलेले शुल्क माफ करण्यास मान्यता देण्यात आली. याबाबत अमरावती महापालिकेने विनंती केली होती. यामुळे या जागेवर क्रीडा सुविधांच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.

अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विविध निवेदन, अर्जांबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती

राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाबाबत उपवर्गीकरण समितीच्या अहवालावर राज्य मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा झाल्यावर या विषयावर प्राप्त निवेदने, अर्जांचा विचार करण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षण उपवर्गीकरणासाठी पाटणा उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल सादर केल्यावर तो आज मंत्रिमंडळापुढे मांडण्यात आला. त्यानुषंगाने प्राप्त झालेल्या निवेदने, सूचना व अर्जांचा विचार करण्याच्या दृष्टीने राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीने याबाबतची कार्यवाही करून, एक महिन्याच्या मुदतीत अहवाल मंत्रिमंडळापुढे सादर करावा, असा निर्णय घेण्यात आला.

भूमि अभिलेख विभागात आता भूकरमापक पदाऐवजी परिरक्षण भूमापक पद

भूमि अभिलेख विभागातील गट क संवर्गातील भूकरमापक हे पद रद्द करून परिरक्षण भूमापक असे पद निर्माण करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. ही पदे रद्द करण्यात आलेल्या भूकरमापक संवर्गातून नियमित पदोन्नतीने व विभागीय परीक्षेद्वारे प्रत्येकी ४० टक्के आणि सरळसेवेने २० टक्के या प्रमाणात भरली जातील.

मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने भूमि अभिलेख विभागाचा सुधारित आकृतीबंध तयार केला आहे. यामध्ये नियमित ९ हजार ६३८ आणि कंत्राटी १ हजार ४५ अशा एकूण १० हजार ६८३ पदांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी भूकरमापक व परिरक्षण भूमापक या संवर्गामध्ये एकूण ६ हजार ९३७ पदे मंजूर आहेत. भूकरमापक पदाच्या शैक्षणिक पात्रता आणि कामाचे स्वरुप पाहता, त्यांना विहित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत समितीने शिफारस केली आहे. त्यानुसार महसूल विभागाने हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर केला. भूकरमापक संवर्ग रद्द करुन ही पदे पदोन्नती व विभागीय परीक्षेद्वारे टप्प्याटप्प्याने परिरक्षण भूमापक संवर्गामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहेत.

भूकरमापक पदे टप्याटप्याने परिरक्षण भूमापक संवर्गामध्ये समाविष्ट झाल्यानंतर हा एकच संवर्ग अस्तित्वात राहील. तसेच गट क संवर्गामध्ये नियुक्तीचा प्रथम स्तर संवर्ग असेल. या संवर्गातील कर्मचाऱ्यांची एकत्रित ज्येष्ठता यादी प्रादेशिक स्तरावर ठेवण्यात येणार आहे. या दोन्ही पदांची कर्तव्य व जबाबदारी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे हे निश्र्चित करतील. तर सेवाप्रवेश नियम सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने सुधारित करण्यात येतील.

राज्यातील हजारो दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीमध्ये भरीव वाढ

शिशुवर्ग ते बारावीच्या दिव्यांग विद्यार्थांना दिलासा

राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे शिशुवर्ग ते आठवी, नववी ते दहावी तसेच अकरावी व बारावीत शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत भरीव वाढ होणार आहे.

महाराष्ट्राच्या व्हिजन डॉक्यूमेंटमध्ये शिक्षण आणि कौशल्य विकास वृध्दिंगत करणे असा मुद्दा समाविष्ट आहे. या उद्दिष्टाला अनुसरून दिव्यांगांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्यात येत आहे. दिव्यांग सक्षमीकरण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या या योजना ८ ते ३४ वर्षे जुन्या आहेत. या योजनांमध्ये कालानुरूप बदल करणे आवश्यक असल्याने तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मध्ये दिव्यांगांना सामान्य व्यक्तीपेक्षा अधिक लाभ देण्याची तरतूद आहे. त्यानुसार दिव्यांगत्वाच्या सर्व २१ प्रकारातील राज्यातील शिशुवर्ग ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ५०० रुपये, नववी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ८०० रूपये (निवासी), ६०० रूपये (अनिवासी), अकरावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा १००० रूपये (निवासी), ८०० रूपये (अनिवासी) शिष्यवृत्ती देण्यात येईल. यापूर्वी शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा १०० ते २०० रूपयांच्या दरम्यान होती. याशिवाय अकरावी व बारावीच्या दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क तसेच अंध विद्यार्थ्यांसाठी दरमहा १५० रूपये वाचक भत्ता आणि दरवर्षी प्रत्यक्ष खर्चाच्या मर्यादेत १५०० रूपये अभ्यास दौऱ्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येईल. बैठकीत या योजनेसाठी अपेक्षित २३ कोटी ११ लाख रूपयांच्या आवर्ती तरतुदीस मान्यता देण्यात आली.

# आरोग्य यंत्रणा तसेच लोकसहभागातून अधिक सशक्त व निरोगी महाराष्ट्र घडवूया - मंत्री प्रकाश आबिटकर

नागपूर, दि. २ : राज्याच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून नागरिकांना मोफत आरोग्य सेवा देण्यात येत आहेत. आरोग्य सुविधा गावपातळीपर्यंत भक्कम करण्यावर भर देण्यात येत आहे. सर्वसामान्यांसाठीच्या मोलाच्या योजनांची माहिती तळागळापर्यंत पोहोचणे आवश्यक असून या योजना यशस्वी करण्यासाठी लोकसहभागाची चळवळ पुढे आले पाहिजे. आरोग्य यंत्रणा तसेच लोकसहभागातून अधिक सशक्त व निरोगी महाराष्ट्र घडवूया, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज येथे केले.



सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने जिल्हास्तरीय पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकरिता अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था अर्थात एम्स येथील सभागृहात आयोजित 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' विभागीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी वित्त व नियोजन राज्यमंत्री ड. आशीष जयस्वाल, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव–२ ई. रविंद्रन, आरोग्य सेवा तथा संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कांदेवाड आदी उपस्थित होते.

'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे केवळ अभियान नसून ती एक व्यापक लोकचळवळ बनावी आणि लोकसहभागातून राज्यभर आरोग्याचा जागर व्हावा हेच या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या अभियानात उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देणे, ग्रामीण भागातील नागरिकांच्या सामूहिक वर्तणुकीत बदल घडविणे आणि आरोग्यदायी जीवनशैली रुजविण्यावर या मोहिमेत भर देण्यात आल्यामुळे लोकसहभागाच्या माध्यमातून आरोग्य संपन्न गाव करण्यावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या अभियानामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा व तालुका यंत्रणा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य उपकेंद्रे व या ठिकाणी कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्यसेवक, सेविका व आशा तसेच ग्रामस्थांचा सक्रीय सहभाग महत्वपूर्ण ठरणार आहे. एकात्मिक कार्यप्रणाली व पारदर्शक मूल्यांकन प्रणालीच्या आधारे, या अभियानातून गुणवत्तापूर्ण कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना आरोग्य संपन्न ग्राम म्हणून मानांकन व प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात येणार आहे, आरोग्य समृद्ध महाराष्ट्र घडविण्यासोबतच हे अभियान यशस्वी करण्यासाठी उत्स्फूर्तपणे पुढे यावे, असेही श्री. आबिटकर म्हणाले.

वित्त व नियोजन राज्यमंत्री ड. आशीष जयस्वाल म्हणाले की, ग्रामीण भागात आरोग्याविषयक उपक्रम राबविणे गरजेचे होते. या अनुषंगाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. शालेय शिक्षणात आरोग्याचा धडा देणे गरजेचे आहे. सर्वांनी आपले कर्तव्य ओळखून काम केले पाहिजे. सर्वांनी आरोग्याची काळजी घेणे खूप महत्त्वाचे आहे. त्यापेक्षा काहीही मोठे नाही. स्वच्छता महत्वाची असून प्रत्येकाने जबाबदार नागरिक म्हणून काम केले पाहिजे, असे ते यावेळी म्हणाले.

सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक यांनी 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाविषयी माहिती दिली. नागपूर तसेच गोंदिया जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनुक्रमे विनायक महामुनी तसेच मुरुंगनाथम एम. यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी मंत्री श्री.आबिटकर यांच्या हस्ते 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियान गीताचे लोकार्पण करण्यात आले. या कार्यशाळेत नागपूर व अमरावती विभागातील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सरपंच, सर्व आरोग्य उपसंचालक, जिल्हा आरोग्य शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, कार्यान्वयीन यंत्रणेचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894